REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें २.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ पुणें, बुधवार, तारीख २१ ऑगस्ट, १९४० अंक ३४

चेअरमन,
व्ही. एन. पाटील, एस्क्वायर,
एम. ए. (कँटब), बार–ॲट–लॉ,
माजी एम. एल. सी.

मॅनेजिंग एजंट,
पी. आय. पाटील ॲंड सन्स

पंचवार्षिक बोनस
तहाहयात रु. ६० दर हजारी हयातींत रु. ५०

प्रगतीच्या पथावर असलेली
दि
ग्रेट सोशल लाईफ ॲण्ड जनरल ॲशुरन्स लिमिटेड.
ब्रँच ऑफिस—लक्ष्मीरोड, पुणें. S एजन्सीकरितां आजच लिहा. S हेड ऑफिस—जळगांव, पू. खा.

पूर्ण स्वदेशी
कमी प्रिमियम, जास्त नफा,
विमेदारांस अत्यल्प हप्त्यांत
भरपूर सवलती
आधुनिक शास्त्रशुद्ध विम्याच्या उपयुक्त
विविध योजना. सविस्तर माहिती मागवा.

के. जी. चौधरी,
लाईफ मॅनेजर.

के. एच. सुराणा, विमा केसरी,
जनरल मॅनेजर.

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन
स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

## विविध माहिती

### बँकांस सुटी

सोमवार ता. २६ ऑगस्ट रोजीं गोकुळअष्टमीनिमित्त बँका बंद राहातील.

### उत्पन्न कमी, खर्च अधिक

युद्धामुळें हिंदुस्थान सरकारचा खर्च गेल्या वर्षाच्या मानानें यंदा वाढणार, हें अपेक्षेस धरूनच आहे. गेला एप्रिल व मे ह्या दोन महिन्यांतला वाढावा सवा चार कोटि रुपये आहे. त्यांतले सुमारें सवातीन कोटि रुपये संरक्षणाबाबतचे आहेत. दोन महिन्यांतल्या उत्पन्नांत गेल्या वर्षाच्या त्याच महिन्यांच्या मानानें तेवीस लक्षांची घट आहे. प्राप्तीवरील कराच्या उत्पन्नांत मात्र वाढ झालेली आहे.

### विमाकायद्यांत दुरुस्ती

हिंदी विमा कायद्यांत दुरुस्त्या करण्याची आवश्यकता भासली असून, त्या संबंधांतल्या सूचनांची चर्चा करण्यासाठी ह्या महिन्याचे अखेरीस सिमला येथें सर रामस्वामी मुदलियार एक परिषद बोलावणार आहेत.

### अमेरिकन रोख्यांविषयींच्या शंकेचें निवारण

अमेरिकन डॉलरमध्यें ज्यांच्या पैशाची फेड व्हावयाची आहे अशा रोख्यांची यादी ते धारण करणारांनीं हिंदुस्थान सरकारास पुरवावी असें मागें जाहीर झालें होतें. त्यासंबंधांत अशी शंका व्यक्त करण्यांत आली आहे कीं, हे रोखे पुष्कळ अंशांनीं हिंदी संस्थानांत धारण केलेले आहेत आणि त्यांस वरील नियम लागू होणार नाहीं, ह्या कारणानें ब्रिटिश हद्दींमधील लोकांस तो अन्यायकारक होईल. परंतु हिंदुस्थान सरकारनें हा संशय आतां दूर केला आहे. संस्थानांतहि वरील प्रकारचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला असून त्यांचेमधील अमेरिकन रोख्यांची माहिती रिझर्व्ह बँकेस पुरवली जाण्याची व्यवस्था झालेली आहे.

### खाकी कापड बनवणारांची परिषद

धातूंपासून तयार झालेल्या रंगांनीं रंगवलेल्या खाकी कापडाच्या उत्पादकांची एक प्रातिनिधिक परिषद हिंदुस्थान सरकारनें बोलावली असून ती ह्या महिन्याच्या २६ तारखेस भरेल असें समजतें.

### युद्धकार्यास मुंबईचें सहाय

लॉर्ड लिन्लिथगो, व्हाइसरॉय, ह्यांनीं मुंबईस गेल्या आठवड्यांत भेट दिली तेव्हां युद्धकार्यास सहाय देण्यासाठी नेमण्यांत आलेल्या चार समित्यांच्या कामाचा वृत्तांत त्यांस निवेदन करण्यांत आला. हिंदी लढाऊ विमानांच्या खर्चाला मुंबईचा हिस्सा म्हणून दहा लक्ष रुपयांचा एक चेक त्यांच्या हातीं देण्यांत आला. ग्रेटब्रिटनच्या संरक्षणासाठीं एक 'स्पिट फायर' विमान खरेदी करावें म्हणून आणखी दीड लक्ष रुपयांची नजर करण्यांत आली.

### हिंदी कपाशीचा हिंदी गिरण्यांत खप

| | गांठी |
|---|---|
| जून, १९४० | ९,४९,२०७ |
| जून, १९३९ | २,५५,१९० |
| १ सप्टेंबर, १९३९ ते ३० जून, १९४० | २४,९१,७२९ |
| १ सप्टेंबर, १९३८ ते ३० जून, १९३९ | २६,१५,१११ |

### बाँबे क्लिअरिंग हाउस

बाँबे बँकर्स क्लिअरिंग हाउसमध्यें ८ ऑगस्ट अखेर संपलेल्या आठवड्यांत १२ कोटि, ४८३ लक्ष रुपये किंमतीच्या १,०७,९५० चेकसची देवघेव झाली.

### हिंद-सिलोन वाटाघाटी

सिलोनमध्यें हिंदी मजुरांस अनेक अडचणी व गैरसोयी सोसाव्या लागतात. त्यासंबंधांत हिंदुस्थान सरकार आणि सिलोनीज सरकार ह्यांचेमध्यें मतभेद उत्पन्न झाले आहेत, त्यांवर उपाय शोधून काढण्यासाठी सिलोनचे मंत्री आणि हिंदुस्थान सरकारचे प्रतिनिधी अधिकारी ह्यांचे दरम्यान येत्या नोव्हेंबर महिन्यांत दिल्ली येथें वाटाघाटी होण्याचें ठरलें आहे.

### जर्मन दंडुकेशाहीचे मार्ग

सिलोनचे गव्हर्नर, सर अँड्रू कॉल्डेकॉट, ह्यांनीं नुकतेंच एका भाषणांत, जर्मनींतले एका काळचे आर्थिक तज्ञ व सल्लागार डॉ. शास्ट, गेल्या वर्षी सिलोनमध्यें प्रवास करीत असतां काय म्हणाले, त्याचा उल्लेख केला. "सिलोनमध्यें तुम्हांला विशेष नजरेंत येण्यासारखें काय दिसलें" असा प्रश्न त्यांस केला असतां डॉ. शास्ट ह्यांनीं उत्तर दिलें:—

"येथील लोकांचा सुस्तपणा. त्यांच्यावर कडक नियंत्रण असेल तर सरकारच्या हुकुमानें येथील शेतकऱ्यांस साऱ्या दिवसभर शेतांत राबवतां येईल." जर्मनांस दंडुकेशाहीशिवाय दुसरें कांहीं समजत नाहीं!

### हिंदुस्थानावर सोपवलेली युद्ध-कामगिरी

ब्रिटिश कॉमन्स सभेंत भाषण करतांना मि. व्हर्नॉन बार्टलेट म्हणाले:—" जिब्राल्टरच्या पश्चिमेकडील भागांतल्या युद्धाचें मध्यवर्ती ठिकाण इंग्लंड आणि सुएझच्या पूर्वेकडील रणक्षेत्राचें केंद्र हिंदुस्थान देश ह्याप्रमाणें कार्याची विभागणी झाली पाहिजे. हिंदुस्थानांतली व्यवस्था आणि तयारी ह्यांचेमध्यें बिघाड होणें आपणांस परवडणार नाहीं."

### टाटा कंपनीस झालेला नफा

टाटा आयर्न अँड स्टील कंपनीस गेल्या सालीं साडेतीन कोटि रुपयांचे वर नफा झाला. ऑर्डिनरी शेअरवर प्रत्येकीं २५ रुपये, पहिल्या प्रेफरन्स शेअरवर प्रत्येकीं ९ रुपये आणि दुसऱ्या प्रेफरन्स शेअरवर प्रत्येकीं ७ रु. ८ आणे ह्याप्रमाणें डिव्हिडंड वाटण्यांत आलें आहे.

### युद्धाचा इतिहास

हिंदुस्थानांत मध्यवर्ती आणि प्रांतिक सरकारांनीं व त्याचप्रमाणें बिनसरकारी व्यक्ती व संस्था ह्यांनीं युद्धाचे संबंधांत केलेल्या कामगिरीचा इतिहास जुळवून लिहिण्याची व्यवस्था झाली आहे. ह्या बाबतची माहिती गोळा करण्यांत येत आहे आणि ती विल्हेस लावण्याच्या कामावर एका खास अधिकाऱ्याची योजना झाली आहे.

### इनकम टॅक्सबाबत अपिलें

'१९३९ च्या इनकम टॅक्स' अमेंडमेंट ॲक्टास अनुसरून सरकारनें इनकम टॅक्स अपेलेट ट्रायब्यूनल नेमलें आहे, त्याच्या कामास डिसेंबर, १९४० मध्यें प्रारंभ होईल.

### डिबेंचर्स शिल्लक नाहींत

मुंबई प्रांतिक सहकारी लँड मॉर्गेज बँकेनें ३३% चीं डिबेंचर्स विक्रीस काढलीं होतीं, तीं सर्व खपलीं आहेत.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ३९८ | जर्मनीच्या अंकित देशांत उपासमार | |
| २ व्हाइसरॉयांच्या घोषणेवर पार्लमेंटचें शिक्कामोर्तब ? | ३९९ | ५ काठेवाडी बंदरें ... | ४०३ |
| ३ विमा कायद्यांत सुचविलेल्या सुधारणा ... | ४०० | ६ पोलिसांचा पराक्रम | ४०४ |
| ४ स्फुट विचार ... | ४०१ | ७ बार्शी सें. को. बँक | ४०४ |
| शुगर सिंडिकेटवर प्रांतिक सरकारांचें नियंत्रण— | | ८ महाड को. अ. बँक | ४०४ |
| टाटा कंपनीची प्रगति— | | ९ स्थानिक स्वराज्य संस्था-विषयींच्या प्रश्नांची चर्चा | ४०५ |
| | | १० निवडक बाजारभाव | ४०७ |



# अर्थ

बुधवार, ता. २१ ऑगस्ट, १९४०


## व्हाइसरॉयांच्या घोषणेवर पार्लमेंटचें शिक्का-मोर्तब ?

व्हाइसरॉय, लॉर्ड लिन्लिथगो, ह्यांनीं हिंदुस्थानच्या राज्यघटनाविषयक भवितव्याचे संबंधांत साम्राज्य सरकारच्या वतीनें घोषणा करून हिंदी पुढाऱ्यांस बोलावून त्यांचें म्हणणें ऐकून घेतलें आणि आपली बाजू त्यांस समजावून दिली. ह्या चर्चेचा परिणाम, घोषणेंत अंतर्भूत असलेल्या योजनेंत लोकमतानुसार बदल होण्याचा संभव आहे असें वाटण्यास जागा होती, ती आतां नाहींशी झाली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. ब्रिटिश पार्लमेंटमध्यें गेल्या आठवड्यांत वादविवाद झाला आणि स्टेटसेक्रेटरींनीं आपलें हिंदुस्थानविषयक धोरण विशद केलें, त्यावरून साम्राज्य सरकारानें व्हाइसरॉयांच्या घोषणेवर शिक्कामोर्तब केलें असल्याचें स्पष्ट झालें आहे. ह्या घोषणेंत तीन प्रमुख गोष्टींचा अंतर्भाव होता. हिंदुस्थानच्या राज्यघटनेचें ध्येय ब्रिटिश वसाहतींचा दर्जा हें आहे ह्याविषयीं अभिवचन ही पहिली बाब होय. युद्धसमाप्तीनंतर राज्यघटना निश्चित करण्यांत येईल, त्यावेळीं हिंदी पक्षोपपक्षांस विशेषतः अल्पसंख्याक गटांस त्या कामीं योग्य स्थान मिळेल आणि घटनेचा प्रश्न सोडवण्याची जबाबदारी ह्या रीतीनें हिंदुस्थानवरच सोपवली जाईल, ही दुसरी बाब होय. तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे मध्यवर्ती कार्यकारी मंडळांत कांहीं प्रातिनिधिक हिंदी पुढाऱ्यांचा अंतर्भाव करणें ही असून लष्करी व्यवस्थेच्या संबंधांत सल्ला देण्यासाठी एक तज्ञ मंडळ नेमण्यांत येऊन त्यांत संस्थानांचे प्रतिनिधी घेणें ही चौथी व शेवटची बाब होय. व्हाइसरॉयांच्या घोषणेंत अशी चतुर्विध योजना ग्रथित केलेली होती आणि सेक्रेटरी ऑफ स्टेट, मि. एमेरी, ह्यांनीं कॉमन्स सभेंत तीच स्पष्ट करून सांगितली आणि तिचेंच समर्थन केलें.

कोणतीहि विशिष्ट राज्यघटना ग्रेटब्रिटननें हिंदुस्थानवर लादूं नये आणि हिंदी लोकांस स्वयंनिर्णयाचा अधिकार देण्यांत यावा ह्या मागणीचा स्वीकार ब्रिटिश सरकारनें केला आहे असें व्हाइसरॉयांच्या घोषणेच्या समर्थनार्थ सांगण्यांत येत आहे. प्रचलित घटनाकायद्याच्या आणि फेडरेशनच्या घटनेच्या प्रतिकूल टीकाकारांचें समाधान करण्याचा प्रयत्नहि तीमध्यें आहे. अल्पसंख्याक पक्षोपपक्षांस घटना निश्चित करण्यांत भरपूर वाव देण्यांत येणार असल्यानें त्यांच्याहि तक्रारीस जागा उरणार नाहीं हें घोषणेचें आणखी एक समर्थन आहे. तसेंच, वसाहतीच्या स्वराज्याचें ध्येय पुढें मांडण्यांत आलें आहे, त्या योगानें हिंदुस्थानास इंग्लंडच्या बरोबरीचें स्थान प्राप्त होणार असल्यानें हिंदी राजकीय महत्त्वाकांक्षा पूर्णपणें तृप्त होण्याची निश्चिति झाली आहे असा युक्तिवाद करण्यांत आला आहे. ब्रिटिश राष्ट्रसंघाचा घटक रहाण्यांत ह्या देशाचा व्यावहारिक फायदा असून तात्विक दृष्ट्या त्यांत कांहींच वावगें नाहीं असें त्याचें स्पष्टीकरण करण्यांत आलें आहे. हिंदुस्थानांतील प्रमुख राजकीय पक्षांमध्यें तीव्र मतभेद असून त्यांची परस्पर समजूत घालण्याचे आजवरचे सर्व प्रयत्न निष्फळ झाल्यानें ह्या देशाच्या वतीनें एकमुखानें मागणी होत नाहीं. ह्या परिस्थितींत कांहीं तरी तडजोडीची व व्यवहारिक योजना जास्तींत-जास्त पक्षांस व गटांस मान्य होईल ह्या रीतीनें तयार करणें व्हाइसरॉयांस प्राप्त झालें. युद्धाच्या प्रस्तुतच्या आणिबाणीच्या प्रसंगीं कालक्षेप व दिरंगाई होऊं देणें अनिष्ट असल्यानें मरीव पण कामचलाऊ स्वरूपाची व्यवस्था करणें हें निकडीचें व अगत्याचें झालें ही स्टेट सेक्रेटरीची व इतर ब्रिटिश मुत्सद्दी ह्यांची भूमिका आहे.

आत्यंतिक विचारांचे दोन्ही टोकांवरचे टीकाकार सोडून दिले आणि व्हाइसरॉयांच्या घोषणेकडे सहानुभूतीनें पहाणारांचा विचार केला असतां ब्रिटिश सरकारच्या धोरणांत त्यांचेकडून सुचविण्यांत आलेले फेरफार करतां येणें शक्य व इष्ट होतें कीं नाहीं हा प्रश्न शिल्लक रहातोच. युद्धसमाप्तीनंतर राज्यघटना बनवली जाणार, ती कोण तयार करणार आणि ती करणारांमध्यें बहुसंख्याक पक्षांचे मत अल्पसंख्याक पक्षांच्या व गटांच्या मानानें अधिक प्रभावी ठरणार अशी भीति वाटत आहे. वसाहतींचें स्वराज्य झालें तरी तें राष्ट्रीय लोकशाहीच्या स्वरूपाचें असलें पाहिजे असें मानणारांचीं मनें ह्या कारणानें साशंक झालीं आहेत. युद्धसमाप्तीनंतर मागील गोलमेज परिषदांच्या इतिहासाची पुनरावृत्ति होणार असेंहि दिसावयास लागलें आहे. मध्यवर्ती कार्यकारी मंडळांत कांहीं प्रातिनिधिक हिंदी पुढाऱ्यांची नेमणूक व्हावयाची आहे, पण हे लोक लेजिस्लेटिव्ह असेंब्लीस जबाबदार असणार नाहींत. युद्धसमाप्तीनंतर यावयाच्या स्वराज्यघटनेचा एक हप्ता सध्याच्या परिस्थितीमध्येंच यावा ही मागणी सदरहु योजनेनें तृप्त केली जात नाहीं. लष्करी तज्ञांचें एक सल्लागारमंडळ नेमण्यांत येणार आहे, त्याचे संबंधांत विधायक टीकाकारांचा हाच आक्षेप लागू होणार आहे. प्रस्तुत आणिबाणीचा प्रसंग लक्षांत घेऊन व्हाइसरॉयांच्या घोषणेंत अंतर्भूत झालेल्या योजनेवर कांहीं विधायक टीका करून ती सुधारण्याविषयीं सूचना करणारांचें समाधान होण्यास मि. एमेरी ह्यांचें भाषण व पार्लमेंटमधील वादविवाद ह्यांनीं अवसर ठेवला आहे असें दिसत नाहीं. हिंदुस्थानचें मनुष्यबळ आणि आर्थिक सामर्थ्य ह्यांचा युद्ध यशस्वी रीतीनें चालण्याचें कामी अधिकांत अधिक उपयोग व्हावा ही इच्छा इंग्लंडप्रमाणें ह्या देशांतहि सार्वत्रिक आहे. ती इच्छा व्यवहारांत कारणीं कशी लावावयाची आणि त्यासाठी कोणते घटनात्मक व आर्थिक उपाय योजावयाचे हा आज जिव्हाळ्याचा प्रश्न सर्व जबाबदार लोकांपुढें आहे. तो सोडवण्याचे कामीं पार्लमेंटांतील चर्चेनें तडजोडीच्या व्यवस्थेचा पुढचा मार्ग बंद करून टाकला आहे असें होऊं नये, असें अनेक हिंदी लोकांस वाटणें स्वाभाविक आहे.

---

# विमा कायद्यांत सुचविलेली सुधारणा

( १९३८ च्या हिंदी विमा कायद्यांत दुरुस्ती करण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार आहे. सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्स ह्या सरकारी अधिकाऱ्यानें व विमा कंपन्यांच्या प्रातिनिधिक संस्थांनीं सरकारकडे ह्याबाबत कांहीं सूचना केल्या, त्यांपैकी ज्या सरकारास सकृत्दर्शनी विचारार्ह वाटल्या, त्या एका पत्रकाचे स्वरूपांत सरकारनें प्रसिद्ध केल्या आहेत. )

### "ॲप्रूव्हड्" रोखे

विमा कायद्यांत प्रारंभीं सरकारमान्य 'ॲप्रूव्हड्' रोख्यांची व्याख्या दिलेली आहे. ह्या व्याख्येचे कक्षेंत कंपनीच्या मुख्य कचेरीची इमारत, मध्यवर्ती अगर प्रांतिक सरकारनें भांडवल व (अगर) व्याज ह्यांची हमी घेतलेले रेल्वे शेअर्स, इंपीरिअल व रिझर्व्ह बँकेचे भाग आणि बरो म्युनिसिपॅलिट्यांनीं आपल्या उत्पन्नाचे तारणावर उभारलेलीं डिबेंचर्स, ह्यांचा समावेश व्हावा, अशी सूचना आहे.

### विमा एजंट

विमा एजंटाचे व्याख्येंत फरक सुचविण्यांत आला आहे, तो मान्य झाल्यास एकाद्या फर्मलाहि एजंट होतां येईल. आयुर्विम्याचें काम मात्र व्यक्तीसच करतां येईल.

### ग्रुप पॉलिसी

विम्याचे व्यवहारास धरून "ग्रुप पॉलिसी"चा अर्थ जितका स्पष्ट व्हावयास पाहिजे, तितका तो सध्याच्या व्याख्येनें होत नाहीं. ग्रुप योजनांत पेन्शन व मृत्यूनंतर पैसे मिळणें ह्या दोन्हींचाहि समावेश होतो; तेव्हां त्यासंबंधांत कायद्यानें रकमेच्या घालून दिलेल्या मर्यादेचा पुनः विचार होणें जरूर आहे.

### डिव्हिडंड व बोनस

४९ व्या कलमांत डिव्हिडंड व बोनस वाटण्यावर नियंत्रण घातलेलें आहे. हें कलम दुरुस्त करून, मूल्यमापनांत वाढावा आढळला तरच डिव्हिडंड अगर बोनस देतां यावें, हें स्पष्ट करण्याची आवश्यकता भासत आहे. मृत्यूसंबंधीं अनुकूल अनुभव, व्याजाचा दर व खर्चाचें प्रमाण ह्यांखेरीज बाकी कोणत्याहि कारणानें मिळणारा वाढावा रेव्हेन्यू अकाउंटमध्यें प्रथम दाखल झाला पाहिजे. रेव्हेन्यू अकाउंटमधून वेगळ्या बाजूस काढलेल्या डिव्हिडंड अगर बोनस ईकलायझेशन फंडूसना अर्थात् हें लागू नाहीं.

### पॉलिसीवर कर्ज घेणारा डायरेक्टर

डायरेक्टर, मॅनेजर, ऑडिटर, वगैरेंस कर्ज देण्यासंबंधींचीं नियंत्रणें २९ व्या कलमांत सांगितलीं आहेत. एकाद्या डायरेक्टरानें आपल्या पॉलिसीचे तारणावर कर्ज घेतलें, तर तो डायरेक्टर म्हणून काम करण्यास नालायक ठरतो कीं काय, अशी शंका उपस्थित झाली आहे, ती दूर होणें आवश्यक आहे.

### चौकशीच्या खर्चाची वसुली

कंपनीच्या कारभाराच्या व्यवस्थेसंबंधीं चौकशी करविण्याचा अधिकार सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सला आहे. त्या चौकशीचा खर्च विमा कंपनीनेंच द्यावयाचा असतो, तथापि ह्या खर्चाचे वसुलीस प्राधान्य दिलेलें नसल्यामुळें सरकारावर तो खर्च पडण्याचा संभव रहातो. जमीनमहसुलाच्या बाकीचे वसुलीप्रमाणें त्या खर्चाची वसुली व्हावी, अशी सूचना करण्यांत आली आहे.

### खर्च कमी करण्याची सूचना

४० व्या कलमांत विम्याचे कामाबद्दल एजंटांस मिळावयाच्या कमिशनचें नियंत्रण केलेलें आहे. हें नियंत्रण पुरेसें प्रभावी नाहीं, असें आढळून आलें आहे. हें नियंत्रण मुख्य एजंटांसहि लागू करून इतर कोणत्याहि प्रकारानें मोबदला घेण्यास त्यास प्रतिबंध करावा, त्यास स्वतः काम मिळवितां येऊं नये, एजंटाचें कमिशन आणखी कमी करावें, वगैरे सूचना करण्यांत आल्या आहेत.

### डायरेक्टर होण्यास सुलभता

ज्या विमेदाराचा विमा तीन वर्षें चालू आहे, अशास डायरेक्टर होतां यावें; विम्याची रकम लक्षांत घेण्याचें कारण नाहीं, अशी दुरुस्ती ४८ व्या कलमांत सुचविण्यांत आली आहे.

### डिव्हायडिंग स्कीम्स

वाटणीचे तत्त्वावर चालू असलेल्या विमा योजना नवीन विमा कायद्यास संमत नाहींत. ॲक्चुअरीचा सल्ला घेऊन, चालू असलेल्या योजना बंद कराव्यात, आणि ज्या योजना बंद करणें अशक्य असेल, त्या पास करण्यास सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सला अधिकार असावा, अशी सूचना आहे.

### प्रॉव्हिडंट सोसायट्यांवर देखरेख

ज्या प्रॉव्हिडंट सोसायट्यांच्या मुख्य कचेऱ्या ब्रिटिश हिंदुस्थानांत नाहींत, अशा सोसायट्यांवर देखरेख प्रभावी रीतीनें ठेवण्यासाठी कायद्यांत पुरेशी तरतूद नाहीं. त्या संबंधांत योजना सुचविण्यांत आली आहे.

### सोड-किंमत

सोड किंमतीचे बाबत खालील सुधारणा सुचविण्यांत आली आहे:—विम्यास पांच वर्षे पुरीं झाल्याविना सोड किंमतीचा हक्क उपस्थित होणार नाहीं. हप्ते भरण्याची मुदत २५ वर्षांपेक्षा कमी असेल, तर सध्याप्रमाणें तीन वर्षांनीं पॉलिसीस सोड किंमत येईल. सोडकिंमतीचा तक्ता पॉलिसीवर लिहून द्यावा लागेल. पेडअप पॉलिसींसहि नफ्याचा वाटा मिळूं शकावा.

### डिबेंचर्स

कित्येक कंपन्यांनीं डिबेंचर्सच्या स्वरूपांत पैसे उभारून आपल्या विमेदारांच्या हिताकडे दुर्लक्ष केलें आहे. डिबेंचर्सवरील व्याज अगोदर द्यावें लागतें. डिबेंचर्समुळें विमेदारांच्या हितास बाध येणार नाहीं, अशी तरतूद केली पाहिजे.

### कायद्याच्या अंमलबजावणीचा खर्च

विमा कायद्याच्या अंमलबजावणीचा खर्च भागविण्यासाठी उत्पन्न वाढविलें पाहिजे. त्यासाठी एजंटांकडून लायसेन्स फी अधिक घेणें, रजिस्ट्रेशन सर्टिफिकिटें दरवर्षी देतेवेळीं विमा कंपन्यांकडून व प्रॉव्हिडंट सोसायट्यांकडून वार्षिक फी घेणें, पॉलिसी तिकिटांवर सरचार्ज बसविणें, ह्या मार्गांनीं उत्पन्न वाढविण्यास सरकारास अधिकार द्यावा, अशी सूचना आहे. ह्या प्रत्येक मार्गानें किती उत्पन्न येईल, ह्यासंबंधीं सध्या चौकशी चालू आहे.

## स्फुट विचार

### शुगर सिंडिकेटवर प्रांतिक सरकारांचें नियंत्रण

संयुक्त प्रांत व विहार ह्या प्रांतांतील साखरेच्या कारखान्यांत तयार होणाऱ्या मालाच्या विक्रीची व्यवस्था करणाऱ्या 'इंडिअन शुगर सिंडिकेट' ह्या संस्थेची घटना व कार्यपद्धति ह्यांचे बाबतींत प्रांतिक सरकारांनीं एक नियंत्रणात्मक योजना सुचविली होती. साखरेच्या धंद्याचें चांगलें संघटन होण्यास त्या योजनेची आवश्यकता आहे असें त्यांचें म्हणणें होतें. सिंडिकेटला सरकारी नियंत्रण शक्य तर नसावें आणि निदान तें अत्यंत मर्यादित स्वरूपांत असावें असें साहजिकच वाटत होतें. सिंडिकेटच्या कार्यकारी मंडळानें सरकारची योजना कांहीं अटींवर मान्य केली होती ती त्या संस्थेच्या मुद्दाम बोलावलेल्या खास सभेपुढें गेल्या आठवड्यांत मांडण्यांत आली. ह्या सभेंत मुख्य ठराव पास झाला, त्यांत सिंडिकेटची मध्यवर्ती कचेरी कानपूर येथें असावी आणि तिचें कार्य सरकार साखरेचे भाव व विकावयाच्या मालाचें प्रमाण ठरवील त्यांच्या मर्यादेमध्यें विक्री करणें हेंच असावें ही व्यवस्था मान्य करण्यांत आली. सिंडिकेटनें ह्यापुढें इतर बाबतींत ढवळाढवळ व करतां केवळ साखरविक्रीची संस्था ह्या नात्यानें काम करावयाचें आहे असें आतां स्पष्ट ठरलें आहे. येत्या दोन हंगामांत साखरेचें उत्पादन कसें नियमित व्हावें ह्याचा उल्लेख वरील ठरावांत आहे. संयुक्त प्रांत व विहार येथील सरकारांनीं नेमलेल्या सिंडिकेटच्या डायरेक्टरांचे हातीं नियंत्रणाची अंतिम सत्ता राहील आणि त्यांच्या निर्णयावर सिंडिकेटला प्रांतिक सरकारांकडे अपील करण्याचा हक्क राहील. साखर कारखान्यांच्या मालाच्या किंमती व विक्रीचीं प्रमाणें सिंडिकेट ठरवील, परंतु त्या बाबतींत शुगर कमिशनची संमति मिळवावी लागेल. सिंडिकेटचा अध्यक्ष प्रांतिक सरकारांच्या संमतीनें निवडला जाण्याची अट त्या सरकारांनीं मागें घेतली आहे.

---

### टाटा आयर्न अँड स्टील कंपनीची प्रगति

गेल्या मार्च अखेरच्या टाटा आयर्न अँड स्टील कंपनीच्या कामाचा व हिशेबाचा वृत्तांत कंपनीच्या भागीदारांच्या सभेंत गेल्या आठवड्यांत मान्य झाला. सभेमध्यें अध्यक्षांनीं कंपनीच्या डिफर्ड शेअर्सचें रूपांतर ऑर्डिनरी शेअर्समध्यें करण्याविषयींच्या योजनेचा उल्लेख केला. इतर भागीदारांस डिव्हिडंड दिल्यानंतर डिफर्ड शेअर्स धारण करणारांस विशिष्ट अटींवर डिव्हिडंड मिळावयाचें असतें. ह्या कारणानें त्यांच्या डिव्हिडंडचे व बाजारभावांचे संबंधांत विलक्षण अनिश्चितपणा असतो. त्यांच्या किंमतींत भयंकर चलबिचल होत असते आणि तिच्या योगानें शेअर बाजारांत जुगारीचें वातावरण निर्माण होतें. ही परिस्थिति लक्षांत घेऊन टाटा कंपनीच्या बोर्डानें डिफर्ड शेअर्स काढून टाकून त्यांच्या जागीं ऑर्डिनरी शेअर्स घालण्याची एक योजना तयार केली असून ती भागीदारांपुढें मान्यतेसाठी मांडण्यांत येणार आहे. टाटा कंपनीच्या कारखान्यांत गेल्या वर्षी विक्रीसाठी तयार स्थितींत ७ लक्ष, ७७ हजार टन इतकें पोलाद तयार झालें. १९२९-३० सालचा उत्पादनाचा आकडा ४ लक्ष, ९२ हजार टन असा होता. ह्या उत्पादनाच्या वाढाव्यासाठी मोठ्या प्रमाणावर खेळतें भांडवल उभें करावें लागलें. युद्ध-परिस्थितींत सर्व जातींच्या पोलादास वाढती मागणी उत्पन्न झाली आहे आणि त्याच्या उत्पादनाचा तीस अनुसरून विस्तार झाला आहे. युद्ध समाप्तीनंतर ही मागणी घटणार आणि मालाचा पुरवठा फाजील होणार हें उघड आहे. त्याच वेळेस पोलादाच्या धंद्यास मिळत असलेलें जकातीचें संरक्षण बंद होणार आणि बाहेरून येणाऱ्या मालाची स्पर्धा तीव्र होणार, ह्या भावी चढामोडींचा अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत निर्देश केला. टाटा कंपनीच्या प्रेफरन्स शेअर्सवरील देणें असलेलें डिव्हिडंड आतां पूर्णपणें वाटून झालें असल्या कारणानें रिझर्व्ह भक्कम करून पुढें डिव्हिडंड स्थिरपणानें सारखें वाटतां येईल ह्या बेतानें व्यवस्था करण्याचें महत्त्व त्यांनीं प्रतिपादलें. टाटा कंपनीचें युद्ध-कार्यास भरपूर सहाय होत आहे ह्या गोष्टीचाहि उल्लेख करण्यांत आला.

---

### जर्मनीच्या अंकित देशांत उपासमार

डेन्मार्क, हॉलंड, बेल्जम इत्यादि देश जर्मनीचे अंकित झाल्यानें त्यांचेवर दुहेरी आपत्ति आलेली आहे. लढाऊ सामुग्री व अन्नाचा पुरवठा ह्यांचा जर्मनींत तुटवडा पडला आहे ती तूट भरून काढण्याचें उत्कृष्ट साधन नाझी राज्यकर्त्यांस ह्या देशांत आयतेंच सापडलें आहे. भल्याबुऱ्या उपायांनीं अंकित राष्ट्रांचा माल स्वतःच्या उपयोगास लावण्याचें धोरण त्यांनीं अंगिकारलें आहे. दुसरें असें कीं, डेन्मार्क वगैरे देशांत जर्मनीची सत्ता नव्हती तेव्हां तटस्थपणाच्या नात्यानें त्यांस परराष्ट्रांशीं देवघेव करतां येत असे. शत्रूच्या ताब्यांतील प्रदेश म्हणून त्यांची नाकेबंदी इंग्लंडनें केली आहे हें सरळच आहे. पण त्यांस अंकितपणाचे दुष्परिणाम मात्र भोगावे लागत असून त्यांची जबाबदारी सर्वस्वीं जर्मनीच्या शिरावर आहे. ह्या उपासमारीचा दोष जर्मनी इंग्लंडच्या माथीं मारण्याचा प्रयत्न करीत आहे. ब्रिटिश आरमारानें जर्मन व्यापाराची नाकेबंदी केली आहे तिच्या योगानें वरील राष्ट्रांची उपासमार होत आहे असा जर्मनीचा कांगावा आहे. एकीकडे ब्रिटिश व्यापार बंद पाडण्याविषयीं बढाई जर्मनी मारीत आहे आणि आपणांस अन्नसामुग्रीची वाण मुळींच नाहीं असें भासवीत आहे आणि दुसरीकडे अंकित राष्ट्रांच्या उपासमारीबद्दल ब्रिटिश राज्यकर्त्यांस जबाबदार धरीत आहे. हॉलंड, बेल्जम, पोलंड, व नॉर्वे या देशांतील लोकांचे हाल वाचवण्याचा प्रयत्न अमेरिकेनें केला पाहिजे ह्या आशयाचा प्रचार मि. हूवर ह्यांनीं चालवला आहे, त्याच्या मुळाशीं भूतदया असेल, पण प्रे. रूझव्हेल्ट ह्यांच्या इंग्लंडला युद्धसहाय देण्याच्या धोरणाविरुद्ध ती मोहीम असणें शक्य आहे. ह्या संबंधांत "हेरल्ड ट्रिब्यून" हें अमेरिकन पत्र म्हणतें कीं, "युद्ध अन्नमय आहे" आणि एका हातानें इंग्लंडला युद्ध-सहाय द्यावयाचें आणि दुसऱ्यानें जर्मनीच्या व्यापाराची ब्रिटिश नाकेबंदी सैल व्हावी अशा प्रचारानें इंग्लंडचें आर्थिक शस्त्र बोथट होण्यास मदत करावयाची हें विसंगत आहे. युरोपांत पावणे दोन कोटि लोकांची उपासमार होत असल्याची ओरड मि. हूवर करतात व त्यांस अन्नाचा पुरवठा करण्याची सूचना अमेरिकन जनतेपुढें मांडतात. ह्याचे ऐवजीं जर्मनीनें आपल्या ताब्यांतल्या अन्नसामुग्रीची योग्य वाटणी अंकित देशांत करावी अशी सूचना त्यांनीं कां करूं नये? ह्या देशास लागणारे खाण्यापिण्याचे पदार्थ पुरवण्याची जबाबदारी जर्मनीची आहे, इंग्लंडची नाहीं.

---

## मुंबईच्या बाजारांतील घडामोडी

### पैशाची विपुलता

गेल्या आठवड्यांत मुंबईच्या बाजारांत कर्जाऊ देण्याघेण्याच्या पैशाची विपुलता होती. अत्यल्प मुदतीच्या ठेवींवरील आणि सरकारी ट्रेझरी बिलांवरील व्याजाचे दर ह्या विपुलतेची उत्कृष्ट निदर्शक होती. मुदत भरल्यामुळें ट्रेझरी बिलांचे पैसे तीं धारण करणारांस मोठ्या प्रमाणावर देण्यांत यावयाचे असून ह्या बिलांची विक्री मर्यादित होणार आहे. ह्या कारणानें पैशास मागणी कमी होऊन व्याजाचे दर हलके रहाणार असा रंग दिसत आहे. कॉल मनीचा दर पाव टक्काच राहिला आणि कर्जें घेणारांमध्यें फारशी आतुरता नव्हती. मुदतबंदी ठेवींवरील व्याजाचे दरांत बदल झाला नाहीं आणि ट्रेझरी बिलांवरील व्याजाचा दर एक आण्यानें आणखी खालीं गेला. मद्रासच्या बिलांचा दरहि फक्त तेरा आणे होता. शेड्यूल्ड बँकांच्या रिझर्व्ह बँकेजवळच्या ठेवींत वाढावा झाला आहे आणि त्यांनीं गिऱ्हाइकांस दिलेल्या कर्जांत घट आहे. हीं सर्व चिन्हें बाजारांत पैशाचा पुरवठा विपुल असल्याचा पुरावा देत आहेत.

### सोनें–चांदी

सोन्याचा बाजार स्तब्ध होता. दर तोळयास ४१ रु. १२ आण्यांच्या आंत-बाहेर व्यवहार झाले. प्रथम भाव जरा नरमले, पण अखेर त्यांत थोडी चढ झाली. चांदीच्या बाजाराचीहि स्थिति अशीच होती. शंभर तोळयास ६३ रु. ३ आण्यांपासून ६३ रु. १० आण्यांपर्यंत चांदीच्या भावांत फेरबदल झाला.

### गळिताचीं धान्यें

शेंगदाण्याच्या भावांत म्हणण्यासारखी सुधारणा झाली नाहीं आणि त्यांचे बाबतींत वातावरण मंदीचें होतें. एरंडीचा भाव १२ रु. ४ आणे आणि १२ रु. ९ आणे ह्यांच्या दरम्यान होता. सरकीचा भाव २५ रुपयांच्या आंत बाहेर होता. आळशी ५.४ रु. ते ५.८ रुपयांच्या सुमारास होती.

### गहूं आणि साखर

गव्हाचा भाव ३ रु. १२ आण्यांचे बेतांत होता. स्वदेशी साखरेचे भाव दर हंड्रेडवेटास १४ रु. १२ आणे ते १५ रुपये ह्याप्रमाणें होते.

### सरकारी रोखे


सरकारी रोख्यांच्या बाजारांतील परिस्थिति मंदीची होती. साडेतीन टक्क्यांच्या प्रॉमिसरी नोटेचा भाव ८८ रु. १२ आण्यांवर घसरून ८९ रु. १२ आण्यांवर आला. ४ टक्क्यांचे (१९६०–७०) रोखे पूर्वीच्या आठवड्यांचे मानानें मंदावले. करमाफ ५ टक्क्यांच्या (१९४५–५५) रोख्यांस चांगली मागणी होती आणि त्यांची किंमत ११० रु. ८ आण्यांच्या आसपास घुटमळत होती. इतर रोखे व निमसरकारी रोखे ह्यांच्या भावांत विशेष फेरफार झाला नाहीं. त्यांच्या किंमती जवळजवळ स्थिर राहिल्या.


फॅन्सी रिस्ट वॉचेस

फुकट फुकट फुकट

१९४० चें मॉडेल ऑटोमॅटिक रिव्हॉल्व्हर

लायसेन्सची जरूर नाहीं




STEVENS CO. CROMWELL CONN U.S.A.

रिव्हॉल्व्हरचा आकार वरील चित्रांत दाखविल्याप्रमाणें आहे. खऱ्याखुऱ्या रिव्हॉल्व्हरप्रमाणें दिसण्यांत असून त्याचा तसाच आवाज होतो. ह्याचें वजन १५ औंस आणि लांबी ७ इंच आहे. नळीमध्यें ६ काडतुसें राहतात आणि तीं एकामागून एक उडवतां येतात. ह्याच्या मोठ्या आवाजानें जंगली श्वापदेंहि घाबरून पळतात आणि चोर व शत्रु ह्यांपासून रक्षणास तो उपयोगी आहे. ७८७ नंबरच्या रिव्हॉल्व्हरची किंमत ४ रु. ८ आणे आहे आणि त्याच्या बरोबर ३५ काडतुसें असतात. नं. ८८८ चें रिव्हॉल्व्हर उत्तम पोलादाचें असून त्याची किंमत ५ रु. १३ आणे आहे. त्याच्याबरोबर ७५ काडतुसें येतात. जादा १,००० काडतुसांची किंमत ३ रु. पट्ट्यासह पेटीची किंमत १ रु. १२ आणे. रिव्हॉल्व्हरसाठी तेल किं. १२ आणे. टपाल हशील वेगळें.

फुकट—प्रत्येक रिव्हॉल्व्हर बरोबर दोन फॅन्सी रिस्ट वॉचेस फुकट बक्षिस दिलीं जातात. तीन रिव्हॉल्व्हर एकदम घेणारास सहा घड्याळें बक्षिस आणि टपाल हशील माफ.

पत्ता:—अमेरिकन पिस्तुल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ (A. P.) अमृतसर (India.)

## काठेवाडी बंदरें

हिंदुस्थानचा आंतरराष्ट्रीय व्यापार मोठ्या प्रमाणावर सुरू झाल्यापासून हिंदी बंदरांचें महत्त्व वाढलें. मुंबई, कलकत्ता, कराची व मद्रास हीं चार बंदरें प्रामुख्यानें पुढें आलीं. १९१४–१८ च्या महायुद्धानंतर कराचीची पहिल्या प्रतीच्या बंदरांत गणना होऊं लागली. विजगापट्टम हें नवीन मोठें बंदर करण्यांत आलें. तसेंच काठेवाडमध्यें पोरबंदर, ओखा, वेरावल, बेदी, भावनगर व नवलाखी या बंदरांत सुधारणा करण्यांत आल्या.

प्रथम प्रतीचें बंदर होण्यास अनेक गोष्टींची अनुकूलता लागते. मालाची चढ-उतार करण्याकरितां बंदरांत मोठमोठ्या बोटी याव्याच्या म्हणजे त्यांना लागणारी विस्तीर्ण जागा व निरनिराळ्या सोई, वादळ किंवा लाटा यांपासून सुरक्षितता व भरपूर खोल पाणी या गोष्टींची आवश्यकता असते. तसेंच, बंदराच्या भोंवतालचा प्रदेश समृद्ध असणेंहि इष्ट असतें. मालाच्या आयात–निर्गतीवर घ्याव्या लागणाऱ्या जकाती, मालाच्या चढउतारीकरितां द्यावी लागणारी मजुरी व माल गोदामांत ठेविला असतांना बंदर-खात्यास द्यावें लागणारें भाडें; तसेंच रेल्वेच्या ने–आणीच्या दरांत सवलत, स्वस्त मजुरी, म्युनिसिपालटीचे किमान दर, स्वस्त विमा दर, उत्पन्नावरील कर इ. पासून माफी, सरकारकडून कमी व्याजाच्या दरानें मिळणारी आर्थिक मदत या सर्व गोष्टींचा विशिष्ट बंदरांतून होणाऱ्या आयात–निर्गतीच्या व्यापारावर प्रत्यक्षाप्रत्यक्ष परिणाम होत असतो. काठेवाडी बंदरांचा संसार पहातांना वरील घटकांचा विचार साकल्यानें करावा लागेल.

ओखा, पोरबंदर, भावनगर इत्यादि बंदरांच्या पुनरुज्जीवनांत त्या त्या संस्थानी सरकारांचा भाग फार मोठा आहे ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. मोठमोठीं बंदरें बांधणें हें अतिशय खर्चाचें काम आहे. तसेंच, त्यांपासून मिळणारें उत्पन्न हळूहळू दीर्घकाल येत असतें आणि बंदरास अर्जितावस्था येणें अनेक गोष्टींवर अवलंबून असून राजकीय सत्ता व सहाय्य हींहि त्यास कारणीभूत असतात.

ओखा हें काठेवाडच्या सर्व बंदरांत महत्त्वाचें बंदर आहे. बाराहि महिने या बंदरांत बोटी येऊं शकतात. बडोदें सरकारनें १९३८ च्या जुलै अखेर ४२ लक्ष रुपयांवर ह्या बंदरावर खर्च करून चढ–उताराच्या अद्यावत् सोई केल्या आहेत. माल चढविण्याचे व उतरविण्याचे दर बंदर-अधिकाऱ्यांनीं ठरवून टाकले आहेत. ओखा सीमेंट कंपनी व ओखा सॉल्ट कंपनी यांच्या मालावर बोटींत चढविण्याचा इतरत्र घेतला जाणारा दर टनावरील ३॥ आण्यांचा खर्च घेतला जात नाहीं.

ओखा बंदरांतून १९३२–३३ मध्यें ८४ हजार टन मालाची आयात व ९० हजार टन मालाची निर्गत झाली; १९३६–३७ मध्यें आयात ४२॥ हजार टनांची व निर्गत १ लक्ष, ३६ हजार टन मालाची झाली. कोळशामुळें आयात घटली तर मीठ व सीमेंटमुळें निर्गत वाढली. जामनगर-द्वारका रेल्वे बडोदा सरकारची नाहीं; तसेंच, ओखा-बंदर काठेवाडच्या अगदीं टोकाला पडतें. वढवाण हें काठेवाडांतील मुख्य रेल्वे-केंद्र. तें ओखापासून २११ मैल लांब आहे. अहमदाबाद ३१२ मैल व दिल्ली ८०० मैल दूर आहे. वरील दोन कारणांमुळें ओखा बंदराची व्हावी तशी भरभराट होत नाहीं.

बेदी हें नवानगरचें मुख्य बंदर आहे. सुमारें १ कोटि रुपये खर्च करून बंदराचें महत्त्व वाढविण्याचा संस्थान सरकारनें प्रयत्न केला असून त्यांत यशहि येत आहे. १९३२–३३ मध्यें १ कोटि, ४१ लक्ष रुपयांची आयात झाली, १९३७–३८ मध्यें ती १ कोटि, ५१ लक्ष रुपयांवर झाली; निर्गतीचा आकडा ४५ लक्ष रुपयांवरून १ कोटि, ५३ लक्ष रुपयांवर चढला. आयातींत कापड, खाण्याचे पदार्थ, धान्य, लाकूड, साखर इत्यादि गोष्टी प्रामुख्यानें आढळतात. निर्गतींत ढोर, कापूस, तूप, चामडी, इत्यादींचा मुख्यत्वें समावेश होतो. रेल्वेनें अजमेर, अबु, अहमदाबाद, आनंद, आग्रा, बिकानेर, बडोदा, भडोच, भोपाळ, दिल्ली, जयपूर, जोधपूर, इंदूर, इत्यादि महत्त्वाचीं व्यापारी ठिकाणें बेदीला जोडलीं असल्यामुळें बंदराची आयात-निर्गत भरभराटीस येण्यास प्रत्यवाय दिसत नाहीं.

भावनगर समुद्राच्या जमिनींत घुसलेल्या चिंचोळ्या भागाच्या तोंडाशीं असून वारंवार भरणारी तेथील खाडी खोल करावी लागते. या कारणानें बंदराचा खर्च बराच वाढतो. तथापि भावनगर सर्व हवामानांत खुलें असणारें बंदर असून जहाजांना सुरक्षितता भरपूर असल्यामुळें त्याचें स्थान काठेवाडी बंदरांत महत्त्वाचें आहे. १९३५ नंतर त्याच्या आयात निर्गतींत घट आढळते. १९३७-३८ मध्यें आयात २ कोटि, २६ लक्ष व निर्गत १ कोटि ७१ लक्ष रुपयांची होती.

वेरावल हें जुनागड संस्थानचें एकमेव बंदर असल्यामुळें तेथील सरकार त्यावर अधिकाधिक खर्च करीत आहे. १९३७ च्या ऑक्टोबर अखेर रु. ५८ लक्ष खर्च झाले. १९३२–३३ मध्यें आयात रु. ८१ लक्ष, निर्गत रु. १ कोटि, ५ लक्ष; व १९३६–३७ मध्यें आयात रु. १ कोटि, २८ लक्ष, निर्गत रु. १ कोटि, ३१ लक्षांची झाली.

नवलाखी हें मोर्वी संस्थानचें प्रमुख बंदर आहे. गुजराथ, उत्तर व मध्य हिंदुस्थान यांचें सान्निध्य व संस्थानी मालकीची रेल्वे या दोन कारणांनीं नवलाखीचें महत्त्व वाढत आहे. त्याच्या आयात–निर्गतीच्या आंकड्यांत प्रशंसनीय प्रगति आहे.

ब्रिटिश हिंदुस्थानांतील बंदरांत, विशेषतः मुंबई प्रांतांतील बंदरांत, आयात-निर्गतीच्या पदार्थांवर ज्या दरानें जकात बसविली जाते असे त्यापेक्षा सवलतीच्या दरानें माल काठेवाडी बंदरांत उतरतो व चढतो असें आढळल्यावरून हिंदुस्थान सरकारनें १९२७ मध्यें त्या संस्थानांतून ब्रिटिश हिंदुस्थानांत माल येऊं लागला किंवा संस्थानांत जाऊं लागला म्हणजे त्या त्या विशिष्ट ठिकाणीं जकाती घेण्यास नाकीं बसविण्यास प्रारंभ केला, त्यामुळें दरांतील फरकाचा बाजारांत दिसणारा परिणाम नाहींसा झाला. तसेंच मुंबईचा तुटणारा व्यापार कांहींसा सावरला. हिंदुस्थान देशाच्या विस्ताराच्या मानानें विचार करतां जितकीं बंदरें अधिक तितकी व्यापाराची सोय अधिक होईल. बंदराबंदरांत स्पर्धा असण्याचें अर्थातच प्रयोजन नाहीं.

### "ग्रामणी"

ग्रामसंघटन आणि ग्रामसुधारणा ह्या कार्यास वाहिलेल्या ह्या मासिकाचा चालू महिन्याचा अंक आमचेकडे आला आहे. ग्रामपंचायती, शेतीच्या धंद्याची सुधारणा इत्यादि खेडेगावांच्या प्रगतीच्या दृष्टीनें महत्त्वाच्या विषयावरची माहिती व लेख त्यामध्यें प्रसिद्ध करण्यांत आले आहेत. मुंबई ग्रामपंचायत कायदा आणि त्याच्या अंमलबजावणींतील गोंधळ हा लेख विचारप्रवर्तक आहे. हा कायदा पास झाला तरी तो अमलांत येण्याच्या मार्गांत कोणते अडथळे आले आहेत आणि त्यांचेमुळें कसा गोंधळ माजून राहिला आहे ह्याचें त्यांतलें वर्णन वाचनीय आहे. शेतीच्या संबंधांतले अंकांतील लेख माहितीनें भरलेले व उपयुक्त आहेत.

## पोलिसांच्या पराक्रमाची रोमांचकारी कथा

### कोंड्या दरवडेखोराचा अंत

डोंगराळ प्रदेशांत, दऱ्याखोऱ्यांत राहून भोंवतालच्या प्रदेशांत लुटालूट करणाऱ्या दरवडेखोरांच्या टोळ्या अजूनहि मधून मधून ह्या प्रांतांत धुमाकूळ घालतात. आगगाड्या, तारायंत्र, चांगले रस्ते, मोटारी ह्यांच्या मनूंत नागरिकांचें जीवित सुरक्षित रहाण्याची व्यवस्था पोलिसांस पूर्वीपेक्षा अधिक सुलभतेनें करतां येत असली आणि दरवडेखोरांचा धंदा अवघड झालेला असला तरी डोंगराळ भागांतील नैसर्गिक परिस्थितीच्या आश्रयानें हा व्यवसाय चालवण्याची स्फूर्ति अद्यापहि कांहीं धाडसी लुटारूंस होते असें दिसतें. पैसेवाल्या लोकांच्या घरांवर छापे घालून त्यांस लुबाडण्यांत आपण कोणतेंहि अनैतिक व अत्याचाराचें कृत्य करीत नसून स्वार्थ व परमार्थ साधीत आहों ह्या पुरातन कल्पनेनेंहि त्यांस पछाडलेलें असतें. ह्या समाज-शत्रूंच्या संघटित लोकांचा समाचार घेऊन त्यांचेपासून नागरिकांचें संरक्षण करणें हुशार व कर्तबगार पोलिसांहि कठिण जातें. म्हणूनच ह्या बाबतींत पोलिसांनीं केलेल्या पराक्रमांचें व मिळवलेल्या यशाचें विशेष महत्त्व असून त्याचें कौतुक करणें आवश्यक असतें.

कोंड्या ह्या नांवाच्या पुणें, नगर, ठाणा व कुलाबा ह्या जिल्ह्यांत धुमाकूळ घालणाऱ्या दरवडेखोरांच्या टोळीचा पाठपुरावा करून अखेर तिचा बीमोड नुकताच पोलिसांनीं केल्याचा रोमांचकारी वृत्तांत प्रसिद्ध झाला आहे. ह्या टोळींत पन्नास इसम होते आणि त्यांचेजवळ बंदुका व तरवारी ह्यांच्या सारखीं शस्त्रें होतीं. त्यांनीं वर सांगितलेल्या जिल्ह्यांमध्यें बरीच लूट करून दोन माणसांचे जीवहि घेतले होते. ह्या टोळीचा उपसर्ग गेल्या फेब्रुआरीच्या प्रारंभीं ठाणा जिल्ह्यांत मुर्बाड येथें प्रथम उघडकीस आला. तिनें ८,५०० रुपये येथें लुटले. पुढच्या दोन महिन्यांत ह्या टोळीनें पुणें जिल्ह्यांत तीन दरवडे घातले. ह्यांपैकीं तिसऱ्या प्रसंगीं कोंड्यानें करंजळे गांवीं कित्येक गांवकऱ्यांच्या डोळ्यांसमोर तेथील पाटलाचें नाक कापलें. हा पाटील गरीब लोकांचा छळ करीत असल्यानें आपण त्यास हें शासन केलें असें त्यानें लोकांस सांगितलें. आपण सावकारांचे शत्रू असून गरीब खेडवळांचे कैवारी आहों असा तो प्रत्येक लुटीचे वेळीं बहाणा करीत असे. पुढें मुर्बाड तालुक्यांत दहा दिवसांत कोंड्यानें चार दरवडे घातले आणि कुलाबा जिल्ह्याकडे मोर्चा वळवून कर्जत तालुक्यांतील नांदगांव येथें हल्ला केला आणि लूट व खून केले. ह्या पुढचा दरवडा मोठ्या प्रमाणावर घालण्यांत आला आणि नगर जिल्ह्यांत १४,८०० रुपयांची लूट टोळीस मिळाली.

ह्या सुमारास पोलीस कोंड्याच्या पाळतीस लागले आणि १५० ची एक पार्टी त्याचा मार्ग काढूं लागली. पण तो डोंगराळ प्रदेशांत वावरत असल्यानें त्यास गाठणें कठिण होतें. पावसाळा आला तेव्हां घाटांमध्यें दरवडेखोरांचा पाठलाग भर पावसांत करणें भाग पडलें. तथापि, पोलिसांनीं आपलें जाळें घट्ट आवळीत आणलें आणि अखेरीस देवळें ह्या कोंड्याच्या स्वतःच्या गांवीं आपलें ठाणें दिलें. तेथून दरवडेखोरांच्या वाटा त्यांनीं रोखून पांच आठवड्यांत त्यांपैकीं ५० लोकांस पकडलें व १०,००० रुपयांची मालमत्ता परत मिळवली. गेल्या जुलैच्या तिसऱ्या आठवड्यांत पुण्याच्या पोलिसास बातमी लागली कीं, कोंड्या पुणें-नगर हद्दीवरील डोंगरांत गुहेमध्यें छपून बसला होता. रात्रीं तिकडच्या सर्व वाटा रोखून पोलिसांनीं त्याच्यावर छापा घातला तेव्हां त्यानें गोळीबार केला, पोलिसांनींहि गोळ्या झाडल्या आणि त्यांत कोंड्यास डोक्यांत गोळी लागून तो तात्काळ गतप्राण झाला. त्याच्या अनुयायांपैकीं कांहीं निसटले, पण सात जण पकडले गेले आणि त्यांच्या गुहेंत १,५०० रुपये किंमतीचे डागदागिने व शस्त्रें सापडलीं.

---

### बार्शी सेंट्रल को ऑपरेटिव्ह बँक लि.

ह्या बँकेचें भाग भांडवल ७८,७९० रु. असून सर्व रिझर्व्हस मिळून ६१,६४२ रु. एवढी रकम बाजूस काढलेली आहे, तीमध्यें सर्वसाधारण रिझर्व्ह ५१,८२२ रुपयांचा आहे. एकूण ठेवींत ४ लक्ष, ४० हजार रुपये आहेत आणि ४ लक्ष, १७ हजार रुपयांचीं कर्जें दिलेलीं आहेत. त्यांतलें १ लक्ष, २ हजार रु. सोसायट्यांस आणि ७२ हजार रु. मालाच्या तारणावर कर्जाऊ दिलेले आहेत. शिल्लक, रोख व बँकेंत मिळून १ लक्ष, १८ हजार रुपये आहे आणि १९ हजार रुपये रोख्यांत वगैरे गुंतवण्यांत आले आहेत. ऑफिस इमारतींत सुमारें १५ हजार रुपये आहेत. रिपोर्टाच्या वर्षी बँकेस निवळ नफा ६,७८५ रुपये झाला. त्यामधून ५ टक्क्यांनीं डिव्हिडंडसाठीं ३,९४० रुपये खर्चावे आणि बाकीमधून निरनिराळ्या फंडांत रकमा टाकाव्या अशी बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची सूचना आहे. तालुक्यांत गेल्या वर्षी नापिकी झाल्यामुळें थकबाकी वाढली आहे असें त्यांनीं म्हटलें आहे. सर्वसाधारण रिझर्व्ह बँकेच्या व्यवहारांत न गुंतवतां त्याबाहेर, त्याची गुंतवण व्हावी ह्या तत्त्वाच्या अंमलबजावणीस प्रारंभ झाला असून १४ हजार रुपयांची व्यवस्था ह्याप्रमाणें केली गेली आहे. एकंदर परिस्थितीचा विचार करतां बँकेचा कारभार चांगला चालला असून ती " अ " वर्गांत आहे.

---

### दि महाड को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि.

ह्या बँकेचा ३० जून, १९४० अखेरचा बारमाहीचा वृत्तांत, ताळेबंद व नफातोटा पत्रक हीं आमचेकडे आलीं आहेत. त्यावरून पहातां बँकेचा कारभार काटकसरीनें व व्यवस्थित रीतीनें चालला आहे असें दिसून येतें. बँकेचें भरलेलें भाग भांडवल २२,२०० रुपये आहे व रिझर्व्ह फंड १,७६२ रुपयांचा आहे. इतर फंडांत ८७५ रु. आहेत. एकूण ठेवींची रकम सुमारें ६१ हजार रु. आहे आणि कर्ज व कॅशक्रेडिट मिळून सुमारें १२ हजार रुपये गुंतवलेले आहेत. रोकड आणि इतर बँकांतली शिलकेचा आकडा मोठा म्हणजे ४२ हजार रुपयांचे वर आहे. तसेंच, सरकारी कर्जरोख्यांत २२ हजार रुपये घातलेले आहेत. बँकेचा पैसा तरता राखण्याची बरीच काळजी घेण्यांत आली आहे हें यावरून उघड होईल. वृत्तांताच्या वर्षी बँकेस २,४२४ रु. इतका निवळ नफा उरला. त्यापैकीं १,०७४ रु. ५ टक्के दरानें डिव्हिडंड म्हणून वाटण्यांत यावें अशी संचालक मंडळाची सूचना आहे. नफ्यांतली उरलेली रकम निरनिराळ्या फंडांत वाटून टाकण्यांत यावयाची आहे. वृत्तांताच्या सालीं भाग भांडवल १,४२५ रुपयांनीं वाढलें. एकंदरीनें बँकेची प्रगति होत असून लोकांचा तिच्यावरील विश्वास वाढत आहे.

## स्थानिक-स्वराज्य संस्थांविषयींच्या प्रश्नांची चर्चा

### प्रांतिक सरकारच्या विद्यमानें परिषद

पुणें येथें कौन्सिलहॉलमध्यें गेल्या शुक्रवारीं व शनिवारीं काळे-कमिटीच्या शिफारशींचा विचार करून त्यांवर अभिप्राय व्यक्त करण्यासाठी प्रांतिक सरकारनें बोलावलेली स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींची परिषद भरली. तिचें उद्घाटन सर रोजर लम्ले, प्रांताचे गव्हर्नर, ह्यांनीं केलें. त्यांनीं जमलेल्या मंडळींचें स्वागत करून प्रो. काळे आणि त्यांचे सहकारी ह्यांनीं काळजी-पूर्वक केलेल्या चौकशीची आणि सूचनांच्या समतोलपणाची प्रशंसा केली. स्थानिक स्वराज्य संस्थांची प्रगति सावकाशपणानें होत आली असली तरी त्यांनीं उपयुक्त कामगिरी बजावली आहे. त्यांचेमध्यें कित्येक दोष उत्पन्न झाले आहेत ते सरकारच्या व जनतेच्या नजरेस आणण्यांत आले आहेत. ते दूर होण्याच्या उपायांची अंमलबजावणी करणें आवश्यक आहे. जनतेच्या जीविताशीं निकट संबंध ज्यांचा येतो अशा बाबी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारांमध्यें येतात, ह्यासाठी त्यांची व्यवस्था कार्यक्षम करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. आपण शांततेच्या वातावरणांत आहोंत, म्हणून पश्चिमेच्या बाजूस युद्धाचा वणवा केवढा पेटला आहे ह्याची कल्पना आपणांस येत नाहीं. इंग्लंड आज मानवजातीच्या व हिंदुस्थानच्या संरक्षणासाठी झगडत आहे. त्या कामीं सहाय करणें स्थानिक-स्वराज्य संस्थांस शक्य आहे. आपल्या शिलका युद्धकर्जामध्यें त्यांस गुंतवतां येतील.

ह्याप्रमाणें गव्हर्नरांचें भाषण झाल्यावर परिषदेचे अध्यक्ष, श्री. मदन, ह्यांनीं प्रास्ताविक भाषण केलें. त्यांनींहि काळे कमिटीच्या रिपोर्टाच्या उपयुक्ततेविषयीं प्रशंसोद्गार काढले. कांहीं स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार चांगला चालला आहे, पण कांहींमध्यें अलीकडे अव्यवस्था आढळून आली आहे असें म्हणून त्या संस्थांनीं आपली सांपत्तिक स्थिति सुधारण्यासाठी सरकारच्या सहायावर अवलंबून राहूं नये असें त्यांनीं सुचवलें. परिषदेंत चर्चिल्या जाणाऱ्या प्रश्नांचा विचार करण्यासाठी सभासदांच्या तीन उपसमित्या नेमल्या आहेत. त्यांनीं पुढें मांडण्यांत आलेल्या प्रश्नांवर अभिप्राय व्यक्त करावा आणि परिषदेनें त्यावर आपलें मत नंतर नमूद करावें अशा कार्यक्रम त्यांनीं निश्चित केला. उत्पन्न-खर्च, कारभार व कार्यें असा तीन गटांमध्यें काळे कमिटीच्या मुख्य शिफारशींची विभागणी करण्यांत आली होती आणि त्या तीन उपसमित्यांवर सोंपविण्यांत आल्या.

कांहीं किरकोळ अपवाद सोडून काळे कमिटीच्या बहुतेक सर्व सूचना उपसमित्यांनीं व परिषदेनें मान्य केल्या. कांहीं बाबतींत मतभेद दिसून आले ते नमूद करण्यांत आले. म्युनीसिपालिट्या व लोकल बोर्ड्स ह्यांनीं करांच्या मार्गानें विवाक्षित रीतीनें आपलें उत्पन्न वाढवावें. सरकारनें कांहीं करांचा ठराविक हिस्सा त्यांचें स्वाधीन करावा (उदाहरणार्थ, जमीनमहसूल, वीज व पेट्रोल, करमणुकी, ह्यांचेवरील प्रांतिक कर), शिक्षणासंबंधाच्या ग्रँट्स निश्चित व भरपूर असाव्या, पब्लिक वर्क्सच्या व कर्जाच्या बाबतींत घावयाच्या सहायाविषयीं उदार धोरण सरकारनें स्वीकारावें इत्यादि सूचना परिषदेनें मान्य केल्या. प्राथमिक शिक्षणाच्या कारभाराबाबतचा अलीकडे दुरुस्तीचा कायदा झाला आहे. तो रद्द होऊन शिक्षणावरचें नियंत्रण स्थानिक संस्थांचे हातीं पुन्हा देण्यांत यावें ह्याविषयीं परिषदेचा विशेष कटाक्ष दिसून आला.

परिषदेचें काम उपसमित्यांनीं सोंपवलेल्या प्रश्नांचा चांगला सल केल्यामुळें शनिवारीं दुपारीं लवकरच संपलें. श्री. मदन ह्यांनीं थोडक्यांत समारोप केला आणि परिषदेच्या वतीनें प्रो. काळे ह्यांनीं त्यांचे आभार मानले. श्री. मदन ह्यांनीं उपस्थित मंडळीस अल्पोपाहार दिला.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अध्यक्षांची परिषद

### गव्हर्नरांचें भाषण

मुंबई प्रांतांतील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अध्यक्षांची एक परिषद पुणें येथें ता. १६ ऑगस्ट रोजीं काळे कमिटीच्या शिफारसींचा विचार करण्याकरितां भरविण्यांत आली होती, तिचें उद्घाटन मुंबई प्रांताच्या गव्हर्नरांनीं केलें. ते म्हणाले:—"लोकल बोर्ड्स आणि म्युनिसिपॅलिट्या ह्यांचे संबंधांतील अनेक प्रश्नांचा विचार करण्यासाठी दोन वर्षांपूर्वी प्रो. काळे ह्यांचे अध्यक्षतेखाली सरकारनें एक कमिटी नेमली. ह्या कमिटीनें आपलें काम अत्यंत पद्धतशीरपणें करून प्रत्येक प्रश्नाचा सर्व बाजूंनीं विचार करून समतोलपणानें आपल्या शिफारसी केल्या आहेत. ह्या शिफारसींवरील आपलीं मतें सरकारास कळावीं, ह्याकरितां ही परिषद बोलावण्यांत आली आहे. रिपोर्टांत मुंबई प्रांतांतील स्थानिक स्वराज्य संस्थांची वाढ कशी होत गेली, ह्याचा आढावा घेण्यांत आला आहे; तो अतिशय उपयुक्त आहे. ही प्रगति फार मंदगतीनें झाली आहे व ह्या संस्थांचा कारभार सुव्यवस्थित पायावर आणण्याचें काम अद्याप व्हावयाचें आहे. प्रांतिक सरकार व स्थानिक स्वराज्य संस्था ह्यांचे संबंध—विशेषत: पैसे व कर लादण्याचा अधिकार ह्याबाबत संबंध—विशेष सलोख्याचे रहाणें कठीण आहे. ह्या संस्थांचा कारभार सुधारण्यास ह्या परिषदेंतील विचारविनिमयाचा उपयोग होईल, अशी मला आशा आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारावर दिवसानुदिवस लोकांची अधिकाधिक टीका होत जाणें स्वाभाविक आहे. हा कारभार सुधारण्यास नागरिकत्वाची जाणीव व शिक्षण ह्यांची वाढ सहायकारक होईल. प्रांतिक सरकार व स्थानिक स्वराज्य संस्था ह्यांच्या मागण्यांचा मेळ घालण्याची आवश्यकता फार मोठी आहे."


## नोटीस.

### दि पूना मर्चंट्स को-ऑपरेटिव्ह बँक लि., पुणें.

(फक्त सभासदांकरितां)

ह्या बँकेची वार्षिक साधारण सभा रविवार ता. १ सप्टेंबर १९४० रोजीं दुपारीं तीन वाजतां भरून त्यांत मागील सभेचें प्रोसिडिंग, अहवाल, ताळेबंद, तसेच पुढील वर्षाचें अंदाजपत्रक मंजूर करणें, कौन्सिल, बोर्ड ऑफ डायरेक्टर्स, व ऑडिटर्स, निवडणें, पोटनियम दुरुस्त्यांचा विचार करणें वगैरे कामें केलीं जातील. निवडणुकीची वेळ सदर दिवशीं सायंकाळीं ५ ते ७ ठेविली आहे. तरी सभासदांनीं सभेस अवश्य यावें अशी विनंति आहे.

बोर्डाचे हुकुमावरून,
व्ही. एम. देवल
एजंट,
दि पूना मर्चंट्स को ऑप. बँक लि., लक्ष्मीरोड, बुधवार पेठ, पुणें.

ता. १६ ऑगस्ट १९४०.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली



दि
## बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड

सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो
बँकेची शेअर–विक्री चालू आहे

मुख्य कचेरी
लक्ष्मी रोड, पुणें.

मुंबई शाखा — दलाल स्ट्रीट, कोट
पुणें शाखा — डेक्कन जिमखाना



## दहा हजार रुपयांचीं घड्याळें बक्षिस

"जौहरे हुस्न" ह्या आमच्या प्रसिद्ध रजिस्टर्ड औषधाच्या वापरण्यानें शरीराच्या कोणत्याहि भागावरील केस कांहींहि त्रास न होतां नाहींसे होतात आणि जन्मभर पुन्हां कधींहि त्या ठिकाणीं ते येत नाहींत. औषध लावलेली जागा रेशमासारखी मऊ, नरम व सुंदर होऊन जाते. बाटलीची किंमत फक्त १ रु. १४ आणे. ह्या औषधाच्या प्रसिद्धी खातर प्रत्येक बाटलीबरोबर एक फॅन्सी रिस्ट वॉच फुकट पाठवण्यांत येतें. हें घड्याळ अत्यंत सुंदर व मजबुत आहे. सौंदर्य व मजबुती ह्या विषयींची दहा वर्षांची गॅरंटी देण्यांत येते आणि गॅरंटीचा करारनामा प्रत्येक घड्याळाबरोबर पाठवण्यांत येतो.

सूचना—माल पसंत न पडल्यास त्याची किंमत परत केली जाते. तीन बाटल्या एकदम घेणारास टपाल हशील माफ आहे आणि तीन घड्याळें बक्षिस मिळतात.

पत्ताः—लंडन कमर्शिअल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ (A. P.) अमृतसर -Amritsar.



## अर्थशास्त्र

लेखक—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें १००, किंमत १ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.



## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| उभारलेलें भांडवल ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,११,००,००० |

मुख्य कचेरी : ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद ( भद्र ऑफिस ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अंधेरी ( मुंबई शेजारी ), बांद्रे ( मुंबई शेजारी ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता ( बडा बझार ), कलकत्ता ( चौरंगी स्क्वेअर ), जमशेदपूर, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष). श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के., के. टी. ( रजेवर ), मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दांजी, श्री. रामनिवास रामनारायण, मि. आर. एल. फेराई.

करंट डिपॉझिट अकाउंटस :

दररोजच्या रु. ३०० से रु. १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास व्यवस्था केली तरच मिळूं शकतें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. इतकी झाल्याशिवाय व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर मागवावेत.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टांचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकिंगचा सर्वसाधारण सर्व व्यवहार केला जातो.

एजंटः—टी. आर. लालवाणी.



## ही हीच वेळ सोनेरी—

नवयुग चित्र

सुलभेनें ही गोष्ट तावडतोब जाणली आणि तिनें आपल्या आयुष्यांतील साथीदार निवडला पण साधना ?

: भूमिका :
- मीनाक्षी
- वनमाला,
- विनायक
- बाबूराव पेंढारकर
- साळवी
- पवार

# लपंडाव

नवयुगचें प्रभावी चित्र

न्यू वेस्ट एण्ड
मुंबई—४ था
आठवडा

—शनिवार ता. १७
ऑगस्टपासून सुरू
मिनर्व्हा-पुणें
रोजच्या वेळा नेहमींच्या—

## निवडक बाजारभाव

बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून) ... ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन (१९४५-५५) | ११०—१२ |
| ४% १९४३ | १०४—४ |
| ३½% बिनमुदत | ८९—१२ |
| ३½% १९४७-५० | १०१—४ |
| ३% (१९६३-६५) | ९०—२ |
| २¾% १९४८-५२ | ९५—४ |
| ४% पोर्ट ट्रस्ट (लांब मुदत) | १०२—३ |
| ४% मुंबई म्युनिसिपल (लांब मुदत) | १०१—८ |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५१-६१) | १०६—८ |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५५) | ११८—० |

### मंडळ्यांचे भाग

(कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००-५०) ११% | १३३—८ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% | १०४—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५०—२५) ८% | ३५—० |
| इंपिरिअल बँक (५००) १२% | १४६०—० |
| पंथे मॉ. को. बँक (५०) ४% | ५३—० |
| रिझर्व्ह बँक (१००) ३½% | १०१—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. (५०) ११% | १२५—४ |
| कराची (१००) ९% | १९७—८ |
| पुणें इलेक्ट्रिक (१००) ९% | १८२—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. (१०००) ५½% | १३३०—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. (१०००) ७½% | १५२२—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती (१००) ४¾% | ९३—० |
| पाचोरा-जामनेर (१००) २% | ६४—० |
| अहमदाबाद प्रांतिज (५००) ११½% | १०२२—८ |
| तापी व्हॅली (५००) ८½% | ७६२—८ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर (५०) ७ रु. | २००—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (१००-५०) २ रु. | ४६—४ |
| सिंधिया स्टीम (१५) १ रु. | १८—६ |
| न्यू इंडिया विमा (७५-१५) १ रु. | १७—२ |
| ओरिएंटल विमा (२००) १२½ रु. | १४१५—० |
| टाटा आयर्न प. प्रे. (१५०) ६% | २०९—६ |
| टाटा आयर्न दु. प्रे. (१००) १८ रु. १० आ. | १४६—८ |
| टाटा आयर्न ऑर्डि. (७५) १५ रु. | ३३७—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड (३०) ७५ रु. ११ आ. १ पै. | १७७५—० |
| असोसिएटेड सिमेंट (१००) ५ रु. | १२१—८ |

स्पृहणीय यश
बोनसचे दरांत २० टक्के वाढ
तारीख ३० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या
मूल्यमापनाचा निकाल

| हयातीनंतरचे विम्यावर | त्रैवार्षिक-दर हजारीं | हयातींतील विम्यावर |
|---|---|---|
| रु. ५४ | बोनस | रु. ४५ |

आजच "कॉमनवेल्थ" ची पॉलिसी घेऊन
कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.
दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स
कंपनी लि० पुणें
लिहा अगर समक्ष भेटा.
श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.
सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.

मधुमेहावरील औषध
तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ६
— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्टस कंपनी लिमिटेड
९२३ ए, सदाशिव, पुणें २.

N. V. WADNERKAR
Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
Raviwar Peth, Saraff Bazar,
POONA CITY.

For Collegians
Wooden & Iron Furniture
FOR SALE AND HIRE
Your Popular Old Shop.
SHEVAK BROS.
*Work-Shop Address:* 153 Kasaba, Poona 2
*Branch No. 1* Shevak Quarters, near Fergusson College Poona 4




एजंटः—
**महादेव गोविंद कुलकर्णी**
किराणा व भुसार मालाचे व्यापारी
७८६ सदाशिव, पुणें शहर.

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
**जर्निमन टेलर व्हा.**
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
**पराडकर टेलर्स ॲकेडिमी,** ६७१ सदाशिव, पुणें.

'अर्थ' ग्रन्थमाला

# बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

**दुसरी आवृत्ति तयार झाली.**

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकं मागविण्याचा पत्ताः--(१) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
(२) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.